"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५वी/९६
पुणे, दि. २२.४.९७.

प्रति,

मुख्याध्यापक,
मावडी पिंपरी हायस्कूल, पिंपरी
ता. पुरंदर, जि. पुणे.

विषय :- इ.५वी ते ७ वी वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील पत्र क्र. माध्य ३/१३/५वी ते ७ वी/पुवि/९५/४४५१. दि. १९.४.९७.

उपरोक्त विषय संदर्भान्वये आपणास कळविणेत येते की, आपल्या माध्यमिक शाळेत इ. ५ वी चा वर्ग सुरु करण्यास जून ९६ पासून विना अनुदान तत्वावर परवानगी देणेत येत आहे. सदर परवानगी खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर देणेत येत आहे.

अटी = १) इ.५वी वे ७ वी वर्गांची परवानगी ही विना अनुदान तत्वावर राहील.

२) मा.शा.संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.

३) वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

माध्यमिक शाळेच्या शालेय तपासणीचे वेळी इ.५ वी च्या वर्गाची तपासणी करून घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.

प्रत,
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती पुरंदर.
२/- खालील दर्शविलेल्या माध्यमिक शाळेची तपासणी करतेवेळी इ. ५ वी च्या वर्गाची तपासणी करणेत यावी.
१) मावडी पिंपरी हाय. पिंपरी. ता. पुरंदर.

पाप्त
[signature]

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९७
पुणे. दि. २७/६/९७

**BOOK-POST**

12-7-97
PUNE



प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

मावडी- पिंपरी हायस्कूल, पिंपरी.

ता. पुरंदर.

<u>विषय</u> :- <u>नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.</u>

सन १९९७-९८, इ.६ वी, ~~७वी~~, ~~९वी~~, १०वी.

आपल्या श्री शिवाजी शि. प्रसा. मंडळ द्वारा संचालित मावडी-पिंपरी हायस्कूल, पिंपरी ह्या माध्यमिक शाळेतील ~~इ. ८वी~~/ ५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/~~इंग्रजी~~ ) सन १९९६ - ९७ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य३/परवानगी/५वीते७वी/पुवि/(६)/४५१ दि. ७/४/९७ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९७ - ९८ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, ~~७ वी~~, ~~९ वी~~, ~~१० वी~~ या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती पुरंदर. यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

14/97-98

Received
12/07/97
I.M.P

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे.करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-?/नै.वाढ/९८
पुणे, दि. १६/६/९८




**BOOK-POST**

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

मावडी पिंपरी हायस्कूल, पिंपरी.
ता-पुरंदर, जि-पुणे.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. सन ~~९७~~-९८-९९.

~~इ.६ वी~~, इ.७ वी, ~~इ.९ वी~~, ~~इ.१० वी~~.

आपल्या श्री शिवाजी शि. प्रसा. मंडळ ---------- द्वारा संचलित मावडी पिंपरी हायस्कूल, पिंपरी -- माध्यमिक शाळेतील इ.~~८ वी~~/ इ. ५ वी चे वर्गास (माध्यम मराठी/~~इंग्रजी~~) सन १९९६ - ९७ या शै. वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य/३(१४)/नमाशा/मान्यता/पुवि/४७१/९६ दि. १०/४/९७ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन ९८-९९ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, इ.७ वी, ~~इ. ९ वी, इ.१० वी~~ चा वर्ग --- - नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी ~~उपशिक्षणाधिकारी जि.प.पुणे~~ / गट शिक्षणाधिकारी, पं.स. पुरंदर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेऊन तपासणी अहवाल या कार्यालयाकडे त्वरित सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे सादर करणेबाबत संपर्क साधावा.

(सही)

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.

03/98-99
Received-
Date- 23/6/98
Sign- (सही)